सातारा जिल्हा परिषद, ग्रामपंचायत विभाग
दूरवनी क्रमांक ०२१६२/२३३८४३ ईमेल vptzpsatara२@yahoo.in

जा. क्र.ग्रापं/५/कावि/ग्राउभाउ/२०१६, दि. ४ /४/२०१६

प्रति,

गट विकास अधिकारी,
पंचायत समिती .... (सर्व)
जिल्हा सातारा

विषय :-ग्राम उदय से भारत उदय अभियान (दि.१४ एप्रिल,२०१६ ते दि.२४ एप्रिल, २०१६)
**अंमलबजावणीबाबत.**

केंद्र शासनामार्फत दिनांक १४ एप्रिल, २०१६ (डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती) ते दिनांक २४ एप्रिल,२०१६ (राष्ट्रीय पंचायत राज दिवस) या कालावधीत **"ग्राम उदय से भारत उदय अभियान"** राबविण्यात येणार आहे. अभियानाच्या मार्गदर्शक सूचना (इंग्रजी) केंद्र शासनाच्या MoPR च्या वेबसाईटवर दिनांक २३.३.२०१६ चे पत्रासोबत प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

त्यानुसार "ग्राम उदय से भारत उदय अभियान" राबविण्यासंदर्भात खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

**"ग्राम उदय से भारत उदय अभियान"** :-

पंचायती राज पध्दती बळकटीकरणासाठी तसेच शेतकऱ्यांचे कल्याण करणे, दुर्बल जनतेचे जीवनमान सुधारणे व सामाजिक एकता प्रस्थापित करणेसाठी "ग्राम उदय से भारत उदय अभियान" एक महत्वाची मोहिम आहे. स्थानिक आर्थिक विकास साधण्यासाठी ग्रामपंचायतीचा विकास आराखडा तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये संपूर्ण लोकसहभाग मिळविण्यासाठी लोकांच्यामध्ये जागृती करण्यासाठी ही एक चांगली संधी आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंतीच्या औचित्याने दिनांक १४ एप्रिल, २०१६ पासून राष्ट्रीय पंचायत राज दिवस दिनांक २४ एप्रिल, २०१६ पर्यंत "ग्राम उदय से भारत उदय अभियान" राबविण्याचे आहे. दिनांक २४ एप्रिल, २०१६ रोजी मा.पंतप्रधान महोदय ग्रामसभांना जाहीररित्या संबोधित करणार असून, मा.पंतप्रधान महोदयांचे भाषण सर्व ग्रामस्थांनी एकत्रित येऊन टेलिव्हीजनच्या माध्यमातून ऐकायचे/पहायचे आहे.

सदरचे अभियान अर्थपूर्ण, प्रेरणादायी व माहितीपूर्ण होण्यासाठी या मोहिमेमध्ये ग्रामपातळीवरील सर्व लोकांचा सहभाग असणे आवश्यक आहे. विशेषतः महिला, अनु.जाती, अनु.जमाती यांचा सहभाग मिळविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी

जाजागृती करणे, दक्षतापूर्वक नियोजन, पंचायतीच्या लेकप्रतिनिधींमध्ये व ग्रामपातळीवरील कर्मचाऱ्यांमध्ये मोठया प्रमाणावर जाणीव जागृती व पध्दतशीर नियोजन करणेत यावे.

"ग्राम उदय से भारत उदय अभियान" अंतर्गत खालील कार्यक्रम अंतर्भूत आहेत.

५) सामाजिक एकता (Social Harmony) : दिनांक १४ ते १६ एप्रिल, २०१६.
६) ग्राम किसान सभा (Gram Kisan Sabha) : दिनांक १७ त २० एप्रिल, २०१६.
७) ग्रामसभा (Gram Sabha or Village Assembly) : दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६.
८) मा.पंतप्रधान महोदयांचे ग्रामसभांना उद्देशून भाषण : दिनांक २४ एप्रिल, २०१६.

1) **सामाजिक एकता** (Social Harmony) : **दिनांक १४ ते १६ एप्रिल, २०१६.:-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीच्या औचित्याने या कालावधीत सर्व ग्रामपंचायतींमध्ये ग्रामस्थांनी एकत्र येऊन डॉ.आंबेडकर यांना वंदन करतील. या कार्यक्रमामध्ये प्रामुख्याने दलितांचा जास्तीत जास्त सहभाग असेल याची खात्री करावी. यावेळी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून ग्रामस्थ सामाजिक एकता निर्माण करण्याचा निर्धार करतील. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व राष्ट्रीय एकात्मतेविषयी त्यांचा दृष्टीकोन याबाबत यावेळी चर्चा करण्यात येईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचेविषयी लेखन साहित्य यावेळी वितरीत करण्यात येईल. या दिवशी, सामाजिक एकता प्रस्थापित करण्यासाठी शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती देण्यात येईल. प्रदर्शनांचे आयोजन करण्यात येईल.

2) **ग्राम किसान सभा** (Gram Kisan Sabha) : **दिनांक १७ ते २० एप्रिल,२०१६** :-

दिनांक १७ ते २० एप्रिल,२०१६ या कालावधीत प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये शेतकऱ्यांची सभा (ग्राम किसान सभा) आयोजित करावयाची आहे. ग्राम किसान सभेमध्ये कृषिविषयक योजनांची माहिती शेतकऱ्यांना द्यावयाची आहे. यावेळी शेतीमध्ये सुधारणा करण्यासाठी शेतकऱ्यांकडून सूचना मागविण्यात येतील.

3) **ग्रामसभा** (Gram Sabha or Village Assembly) : **दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६.**

राष्ट्रीय पंचायत राज दिवस प्रत्येक वर्षी २४ एप्रिल रोजी साजरा करण्यात येतो. कारण याच दिवशी ७३ वी घटना दुरुस्ती अंमलात आली. ग्रामपंचायतींसाठी हा अत्यंत महत्वाचा दिवस असून गावाच्या विकासासाठी ग्रामस्थांना एकत्रित करण्याची चांगली संधी आहे. या वर्षी राष्ट्रीय पंचायत राज दिवस ग्राम उदय से भारत उदय अभियानाच्या स्वरुपात साजरा करावयाचा आहे. यासाठी जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतींनी दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत कोणत्याही दिवशी **ग्रामसभा** आयोजित करावयाची आहे. सामाजिक व आर्थिक मुद्यांबरोबरच स्थानिक आर्थिक विकास, ग्रामपंचायतींचा विकास साधण्यासाठी ग्रामस्थांनी एकत्र यावे हा या ग्रामसभेच्या आयोजनाचा उद्देश आहे. सर्व ग्रामस्थांनी गावाच्या व देशाच्या विकासासाठी एकत्र येऊन **शपथ** घ्यावयाची आहे. दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत ग्रामपंचायतींनी खालील उपक्रम राबवावयाचे आहेत.

- **पूर्वतयारी म्हणून खालील उपक्रम हाती घ्यावयाचे आहेत :**
    - ❖ प्रभात फेरी
    - ❖ स्वच्छता मोहिम
    - ❖ सांस्कृतिक कार्यक्रम
    - ❖ क्रिडा स्पर्धा
    - ❖ ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान

❖ **प्रभात फेरी :-**

राष्ट्रीय पंचायत राज दिवसाचे महत्व ग्रामस्थांना पटवून देण्यासाठी व त्याबाबत वातावरण निर्मिती करण्यासाठी सर्व ग्रामस्थांना समाविष्ट करुन **प्रभात फेरीचे** आयोजन करावयाचे आहे. प्रभात फेरी दोन भागांमध्ये आयोजित करण्यात यावी. १) एका भागात मुले-मुली प्रभात फेरीत सहभागी होतील. यात मुली-मुलींना प्रभावित करणारे मुद्दे उदा.स्वच्छता, शिक्षण व अन्य स्थानिक मुद्यांबाबतचे संदेश देणारे प्लेक्स घेवून सहभागी होतील. प्रभात फेरीत प्लेक्सवर प्रदर्शित करावयाचे संदेशासाठी स्पर्धा आयोजित करुन मुलींनी तयार केलेले तक्ते, पोस्टर्स प्रभात फेरीच्यावेळी घोषणांसोबत प्रदर्शित केले जाऊ शकतील. २) दुसऱ्या भागात प्रौढ नागरिक सहभागी होतील. यात सहभागी होणारे नागरिक आर्थिक विकास व सामाजिक न्याय या संदर्भातील संदेश लोकांपर्यंत पोहचण्यासाठी प्लेक्स, घोषणा, स्लोगन अथवा इतर संवाद साधनांचा वापर करतील. प्रौढ नागरिकांच्या प्रभात फेरीमध्ये प्रामुख्याने ग्रामपंचायत विकास आराखडा प्रक्रियेवर भर दिला जाईल. तसेच गावातील सामाजिक व आर्थिक मुद्यांवर भर देण्यात येईल. या प्रभात फेरीत ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, महिला बचत गटातील सर्व सदस्य, प्रतिष्ठीत ज्येष्ठ व्यक्ती, युवक मंडळातील सर्व सदस्य, विविध योजनांतील साधन व्यक्ती (Resource Persons), ग्रामस्तरावरील शासकयि व निमशासकिय कर्मचारी यांना समाविष्ट करुन घेणे अत्यंत महत्वपूर्ण आहे.

❖ **स्वच्छता मोहिम :-**

दिनांक २१ ते २४ एपिप्रल, २०१६ या कालावधीत प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छता मोहिमेचे आयोजन करावयाचे आहे.ज्यामध्ये गावातील रस्ते, गल्ली-बोळे, इ.ची स्वच्छता, पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची स्वच्छता, हातपंप प्लॅटफॉर्मची स्वच्छता, कचरा विल्हेवाटीसाठी कंपोस्ट खड्डे (digging of garbage pits) तयार करणे, लोकांच्यामध्ये स्वच्छताविषयक जागृती करणेसाठी गृहभेटी, सार्वजनिक साफसफाई मोहिम इ.बाबींचा समावेश करावयाचा आहे.

शाळा, सार्वजनिक संस्था, कार्यालये, गृहभेटी अशा विविध ठिकाणी एकाचवेळी स्वच्छताविषयक वातावरण निर्मिती करणेसाठी ग्रामपंचायत सदस्यांचे ३ ते ४ गट तयार करावेत. प्रत्येक गटात महिलांसह सर्व वयोगटांतील लोकांना सहभागी करुन घ्यावयाचे आहे.

❖ **सांस्कृतिक उपक्रम :-**

दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत प्रत्येक ग्रामपंचायतीमार्फत सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येतील. यात पथनाट्ये, पारंपारिक सांस्कृतिक प्रकार, लोकगीते, लोकनृत्य इ.चा समावेश करावयाचा आहे. ग्रामपंचायतीमधील महसुली गांवे, वाडया-वस्त्यांमधील महिलांसहित जास्तीत जास्त लोकांचा यात सहभाग मिळण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे. सांस्कृतिक उपक्रमात जास्तीत जास्त लोकसहभाग मिळण्यासाठी महिला बचत गट, युवक मंडळे आणि शाळा यांना उद्युक्त करावे. विकासाबाबत व सामाजिक विषयांबाबत विद्यार्थ्यांचे स्टेज प्ले करण्यासाठी नियोजन करावे.

❖ **क्रिडा स्पर्धा :-**

दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत ग्रामपंचायत स्तरावर विविध क्रिडा स्पर्धांचे आयोजन करावयाचे आहे. जास्तीत जास्त लोक क्रिडा स्पर्धेमध्ये सहभागी होतील यादृष्टभ्ने स्पर्धा आयोजित कराव्यात. शाळा, माध्यमिक , उच्च माध्यमिक विद्यालये तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी, युवक मंडळांचे सदस्य याबरोबरच स्वयंसेवकांची मदत क्रिडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी घेण्यात यावी. ग्रामपंचायतीचे क्षेत्रफळ व लोकसंख्या विचारात घेवून महसुली गावनिहाय क्रिडा स्पर्धा घ्यायच्या कि ग्रामपंचायतस्तरावर एकत्र स्पर्धा घ्यायच्या याबाबत ग्रामपंचायतीने सुयोग्य निर्णय घ्यावा.

क्रिडा स्पर्धांमधील विजेत्यांना ग्रामसभेमध्ये पुरस्कार देऊन सन्मानित करण्याबाबत ग्रामपंचायती निर्णय घेवू शकतील.

❖ **ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान :-**

गावामधील ज्येष्ठ नागरिकांचा यथोचित सन्मान राष्ट्रीय पंचायत राज दिवस-ग्रामसभेमध्ये घेण्याबाबत ग्रामपंचायतींनी नियोजन करावे.

**ग्रामसभेत विचारात घ्यावयाचे मुद्दे :**

ग्रामसभेत प्राधान्याने खालील विषयांवर चर्चा करण्यात यावी.

- ❖ स्थानिक आर्थिक विकासासाठी ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणे.
- ❖ निधीचा ग्रामपंचायतीमार्फत योग्य विनियोग करणे.
- ❖ सुरक्षित पिण्याचे पाणी आणि स्वच्छता.
- ❖ ग्रामीण विकासामध्ये महिलांची भुमिका.
- ❖ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अपंग व्यक्ती, इतर दुर्बल घटक यांचे कल्याण व सामाजिक समावेशन.

- **ग्रामसभेत खालील महत्वाच्या शासकिय योजनांची माहिती देण्यात यावी. :**

१. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (PMGSY)
२. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (MGNREGA)
३. प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना
४. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना
५. प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना
६. अटल पेन्शन योजना
७. प्रधानमंत्री जन धन योजना
८. सुकन्या समृध्दी योजना
९. बेटी बचाओ बेटी बढाओ योजना
१०. सर्व शिक्षा अभियान
११. आम आदमी विमा योजना
१२. राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना
१३. प्रधानमंत्री मुद्रा योजना
१४. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (PMKVY)
१५. दिन दयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजना
१६. प्रधानमंत्री पीक विमा योजना
१७. दिन दयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना
१८. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM)

१९. एकात्मिक बाल विकास सेवा (ICDS) योजना
२०. दिन दयाल अंत्योदय योजना (Day)
२१. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींसाठी विशेष योजना
२२. राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम (NSAP)
२३. प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजना (PMKSY)

या ग्रामसभेमध्ये सर्व ग्रामस्थ गावाच्या व देशाच्या विकासासाठी निर्धार करतील. ग्रामसभेला शासनाचे प्रतिनिधी हजर राहणार आहेत. सदरचे प्रतिनिधी ग्रामसभेत उपस्थित राहून ग्रामसभेतील चर्चेमध्ये सहाय्य करतील. मा.खासदार, मा.आमदार, जिल्हा परिषदेचे मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, विषय समित्यांचे सभापती, पंचायत समित्यांचे सभापती तसेच केंद्र शासनाचे, राज्य शासनाचे व जिल्हा परिषदेचे अधिकारी यांनी जास्तीत जास्त ग्रामसभांना उपस्थित राहून ग्रामस्थांना मार्गदर्शन करावयाचे आहे. जास्तीत जास्त प्रश्न विचारण्याची मोकळीक ग्रामस्थांना देण्यात यावी. ग्रामसभेला उपस्थित राहणारे साधन व्यक्ती/संपर्क अधिकारी व ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्यांनी समर्पक उत्तरे दिली पाहिजेत. ग्रामसभेत दुर्लक्षित व्यक्तींवर विशेष (Marginalized persons)लक्ष देण्यात यावे.

**दिनांक 24 एप्रिल. 2016 रोजी मा.पंतप्रधान महोदयांचे ग्रामसभांना उद्देशून भाषण :-**

दिनांक २४ एप्रिल, २०१६ रोजी मा.पंतप्रधान महोदय सर्व ग्रामसभांना उद्देशून भाषण करणार आहेत. त्यादृष्टीने जास्तीत जास्त ग्रामपंचायतींनी यादिवशी ग्रामसभेचे आयोजन करावे. ज्याठिकाणी अन्य दिवशी म्हणजेच दिनांक २१, २२ किंवा २३ एप्रिल, २०१६ रोजी ग्रामसभेचे आयोजन करण्यात येणार आहे अशा ग्रामपंचायतींनी दिनंक २४ एप्रिल, २०१६ रोजी **विशेष सभा** आयोजित करणे आवश्यक आहे. लोकांनी गावामध्ये एका ठिकाणी एकत्रित येवून भाषण ऐकावे हा प्रमुख हेतु आहे.

- दिनांक २४ एप्रिल, २०१६ रोजी मा.पंतप्रधान महोदयांचे भाषण ऐकण्यासाठी/ पाहण्यासाठी योग्य ठिकाणाची/प्रशस्त जागेची निवड ग्रामपंचायतींनी करावी.
- लोकांना बसण्यासाठी यथोचित बैठक व्यवस्था करावी.
- सर्व ग्रामस्थांना भाषणाची वेळ व ते ऐकण्यासाठी एकत्र येण्याचे ठिकाण याची पूर्वकल्पना योग्य प्रसिध्दी देवून, गृहभेटी करुन देण्यात यावी.
- भाषण ऐकण्यासाठी/पाहण्यासाठी टेलिव्हिजन/रेडीओची व्यवस्था करावी.
- भाषण सर्व ग्रामस्थांना स्पष्ट ऐकू जाईल यादृष्टीने स्पीकरची चांगली व्यवस्था करावी.
- टेलिव्हीजनसोबत स्क्रीन प्रोजेक्टरच्या सहाय्याने भाषण पाहण्याची/ऐकण्याची व्यवस्था ग्रामपंचायतीने केल्यास हे माध्यम अधिक प्रभावी ठरेल.
- टेलिव्हीजन, प्रोजेक्टर चालविण्यासाठी तज्ञ व्यक्ती ग्रामपंचायतीने उपलब्ध ठेवावी.
- *काही कारणामुळे वीज पुरवठा खंडीत झाल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून जनरेटरची व्यवस्था करण्यात यावी.*
- भाषण ऐकण्यासाठी जमलेल्या लोकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ग्रामपंचायतीने करावी.
- ग्रामपंचायतीकडून पूर्ण पूर्वतयारी झाल्याबाबतचा OK रिपोर्ट तालुकास्तरावर घ्यावा.
- थेट प्रक्षेपणाचे प्रात्यक्षिक करण्यात यावे जेणेकरुन आयत्यावेळी ग्रामस्तरावर तांत्रिक अडचणी निर्माण होणार नाहीत.

- मा.पंतप्रधान महोदयांचे भाषणाची वेळ आणि ऐकण्याचे एकत्रित ठिकाण सर्व लोकांना माहिती झाली असल्याची सुनिश्चिती ग्रामपंचायत आणि ग्रामपंचायत पातळीवरील सर्व शासकिय, निमशासकिय, कंत्राटी कर्मचारी यांनी करावयाची आहे.

- **तालुकास्तरीय अभियान समिती**. :-
  - केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तालुकस्तरावर अभियान समिती तात्काळ गठीत करावी.
  - या समितीमध्ये तालुकापातळीवरील सर्व संबंधित विभागाचे अधिकारी, साधन व्यक्ती (विशेषतः ग्राम विकास आराखडा तयार करण्याच्या प्रक्रियेतील साधन व्यक्ती) यांचा समावेश करावा.
  - अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायत स्तरावर संपूर्ण पूर्वतयारी पूर्ण झाली असल्याची सुनिश्चिती ही समिती करील.
  - या मोहिमेमध्ये ग्रामपातळीवरील सर्व लोकांचा सहभाग असणे आवश्यक आहे. विशेषतः महिला, अनु.जाती, अनु.जमाती यांचा सहभाग मिळविण्यासाठी ही समिती प्रयत्न करील.

- **सर्व ग्रामपंचायतीमध्ये कार्यक्रमांची सुनिश्चिती**. :-

  ग्राम उदय से भारत उदय अभियान तीन टप्प्यामध्ये राबविण्यात येणार आहे. सामाजिक एकता - १४ ते १७ एप्रिल, २०१६, ग्राम किसान सभा- १८ ते २० एप्रिल,२०१६ आणि राष्ट्रीय पंचायत राज दिवस ग्रामसभा २१ ते २४ एप्रिल २०१६ अशा ती टप्प्यामध्ये अभियान राबवावयाचे आहे. सर्व ग्रामपंचायतींमध्ये हे कार्यक्रम त्या-त्या टप्प्यामध्ये कोणत्याही एका दिवशी सर्व कार्यक्रम प्रभावीपणे राबविता यावेत यासाठी अशा प्रकारचे नियोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी साधन व्यक्ती तसेच ग्रामपंचायत निहाय संपर्क अधिकारी नेमून ते सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहून ग्रामपंचायतींना मार्गदर्शन करतील व कार्यक्रम परिणामकारक हातील याची सुनिश्चिती करतील.

- **साधन व्यक्ती** (Resource persons) **व स्वयंसहाय्यता गट** (SHGs) :-

  ग्राम उदयसे भारत उदय अभियानाच्या परिणामकारक अंमलबजावणी साठी साधन व्यक्तींची मदत घेणे संयुक्तीक होईल. यासाठी ग्राम विकास आराखडा तयार करण्याच्या प्रक्रियेतील साधन व्यक्तींचा उपयोग होऊ शकतो. त्यादृष्टीने ग्रामपंचायतींनी कार्यवाही करावी. महिलांच्या समस्या मांडण्यासाठी व महिलांमध्ये जाणीव जागृती होण्यासाठी स्वयंसहाय्यत गटाच्या महिला सदस्या महत्वाची भुमिका पार पाडू शकतील. त्यादृष्टीने स्वयंसहाय्यता गटांचा जास्तीत जास्त सहभाग घेण्यात यावा.

- **लोकप्रतिनिधी यांची भुमिका** :-

  दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत होणाऱ्या राष्ट्रीय पंचायत राज दिवस ग्रामसभेला उपस्थित राहणे व या कार्यक्रमास प्रोत्साहन देणे, सहाय्य करणे यासाठी लोकप्रतिनिधी महत्वाची भुमिका पार पडू शकतील. जिल्हा परिषद व पंचायत समितीचे लोकप्रतिनिधी यामध्ये महत्वाची भुमिका बजावू शकतील. त्यासाठी आपले तालुक्यातील जिल्हा परिषदेचे व पंचायत समितीचे सन्मा.पदाधिकारी, सदस्य यांना विविध ग्रामपंचायतींच्या तीनही टप्पामधील कार्यक्रमामध्ये उपस्थित राहणेबाबत लेखी विनंती करण्यात यावी.

- **अधिकाऱ्यांची भुमिका** :-

  ग्राम उदयसे भारत उदय अभियानाच्या परिणामकारक अंमलबजावणीमध्ये ग्रामपंचायत विकासाशी निगडीत सर्व विभागाचे अधिकारी, समाजकल्याण विभागाचे अधिकारी यांनी महत्वाची भुमिका पार पाडण्याची आहे. ग्रामपंचायनिहाय अभियानाची अंमलबजावणीत

आवश्यक ते सहकार्य करणे व समस्यांची सोडवणुक यासाठी अधिकाऱ्यांना विविध ग्रामपंचायतींची जबाबदारी सोपविण्यात यावी. प्रत्येक तालुक्यासाठी एक नोडल अधिकारी नेमण्यात यावा. मा.जिल्हाधिकारी यांचेस्तरावरुन कार्यक्रमाची तालुकानिहाय व ग्रामपंचायत निहाय संनियंत्रण करुन कार्यक्रमाच्या व्यवस्था व गुणवत्तेची सुनिश्चिती करतील. तसेच ग्रामसभेचे गुणवत्तापूर्वक आयोजन व मा.पंतप्रधान महोदयांचे भाषण याच्या यशस्वीतेची सुनिश्चिती करण्यात यावी.

केंद्र व राज्य शासनाच्या तसेच जिल्हा परिषदेच्या सर्व प्रमुख अधिकारी यांनी त्यांचे विभागाचे मनुष्यबळ या कार्यक्रमास सहकार्य देणेसाठी व संनियंत्रणासाठी उपलब्ध करुन द्यावयाचे आहे. जिल्हास्तरीय समितीमध्ये याबाबत जिल्हास्तरावरील अधिकारी यांना सूचना देण्यात येतील. त्यादृष्टीने आपले स्तरावर सर्व यंत्राणांचा सहभाग घेण्यात यावा.

तालुकास्तरावर गट विकास अधिकारी व ग्रामपंचायत स्तरावरील संबंधित नियुक्त केलेले संपर्क अधिकारी हे नोडल अधिकारी आहेत यांनी तीनही टप्प्यातील कार्यक्रमांची आवश्यक ती पूर्वतयारी ग्रामपंचायतीने पूर्ण केली असल्याची खात्री करावी. कार्यक्रमात येऊ शकणाऱ्या अडचणी वेळीच ओळखून त्यांचे निराकरण नोडल अधिकारी यांनी केले पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत ग्राम उदय से भारत उदय अभियान कोणत्याही अडचणीविना, अडथळयाविना यश्स्वीरित्या पूर्ण करण्याचा निर्धार करावा.

सर्व अधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संपूर्ण सहकार्य करावयाचे असून सदरचा कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या सुलभ सहकार्यातून ग्रामपंचायतस्तरावर आयोजित केले जाणार आहेत.

- **वाचन साहित्य** :-

  राज्यस्तरावरुन कृषि विभाग, सामाजिक न्याय विभाग, ग्राम विकास विभागाकडून आवश्यक ते वाचन साहित्य ग्रामपंचायतींना तीनही टप्प्यासाठी देणेसाठी प्रात होणार आहे. ते प्राप्त होताच आपलेकडे वितरीत करता येईल. या साहित्याचे वाचन व व्यापक चर्चा ग्रामपंचायतीमध्ये करण्यात यावी.

- **प्रसार माध्यम** :-

तालुक्यातील कार्यक्रमांची वर्तमानपत्रे व इलेक्ट्रॉनिक मिडीया यांच्या मार्फत् व्यापक प्रसिध्दी देणेत यावी.

निबंधलेखन, चित्रकला व रेखाचित्र स्पर्धांचे आयोजन शाळांमध्ये आयोजित करणेत यावे. Social Media चा वापर मोठया प्रमाणावर करावा. याद्वारे कार्यक्रमांचे फोटोग्राप्स, यशोगाथा मोठया प्रमाणावर व तत्परतेने प्राप्त करुन घेता येतील.

- **अहवाल व Documentation** :-

१.सामाजिक एकता, २.किसान ग्रामसभा व ३. राष्ट्रीय पंचायत राज दिवस ग्रामसभा अशा तीन टप्प्यांचे स्वतंत्र अहवाल व डॉक्युमेंटेशन (फोटो, सीडी, अहवाल इ.)तालुकास्तरावर ग्रामपंचायत निहाय संकलित करावयाचे आहे. याबाबतचे Format यथावकाश आपणास कळविण्यात येईल.

यामध्ये सर्व ग्रामपंचायतींमध्ये सर्व कार्यक्रम आयोजित केले आहेत किंवा कसे, राबविलेले महत्वाचे उपक्रम, विशेष प्रयत्न, नाविन्यपूर्ण प्रयत्न व अनुभव यांचा समावेश अहवालात असणे आवश्यक आहे. यासाठी ग्रामपंचायतींना अहवालाचे formats यशावकाश देण्यात येतील.

उपरोक्तप्रमाणे नियोजनबध्द रित्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करणेत यावी. तसेच –

१. तालुकास्तरीय समितीचे गठण तात्काळ करुन वेळोवेळी बैठका घ्याव्यात.
२. तालुक्यातील सर्व ग्रामसेवक, तालुकास्तरीय अधिकारी/कर्मचारी यांची एक दिवसाची नियाजन बैठक घेवून सदर अभियानाची सखोल माहिती देवून मार्गदशर्क सूचना ग्रामपंचायतींना निर्गमित कराव्यात. या बैठकीत जिल्हा परिषद व पंचायत समितीचे सन्मा. पदाधिकारी व सदस्यांना बोलाविण्यात यावे.
३. ग्रामपातळीवरील सर्व शासकिय व निमशासकिय कर्मचाऱ्यांनी अभियानाच्या तीनही टप्प्यामध्ये सक्रिय सहभागी होवून अभियान यशस्वी करणेबाबत सर्व संबंधितांना सूचना निर्गमित कराव्यात.
४. ग्रामसभांना उपस्थित राहण्यासाठी व ग्रामसभेत विविध योजनांची माहिती देण्यासाठी प्रत्येक ग्रामसभेकरिता स्वतंत्र संपर्क अधिकाऱ्यांचे नियुक्ती आदेश काढावेत. आदेशाची प्रत या कार्यालयास देण्यात यावी.

६) ग्राम उदय से भारत उदय अभियान कालावधीत म्हणजेच दिनांक १४ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये दिलेले उपक्रम आणि विषयांची माहिती ग्रामस्थांना देता येईल. त्याबरोबरच सातारा जिल्हा परिषदेचे नाविन्यपूर्ण उपक्रम (पंचसूत्री) काही निवडक गावांमध्ये अभियान कालावधीत राबविणे शक्य आहे.

१. सेंद्रिय शेती (Organic Farming)
२. आपले आरोग्य आपल्या हाती.
३. आपली वाटचाल स्वावलंबनाकडे
४. मैत्री (SC/ST/दुर्लक्षित घटक यांचे समावेशन)
५. तालुक्याशी निगडीत मुद्दे (दुष्काळ/अतिवृष्टी/दुर्गम भागातील समस्या निवारण)

उपरोक्त नाविन्यपूर्ण उपक्रमाबाबतचा सविस्तर कार्यक्रम साधन व्यक्तींची उपलब्धता व ज्या गावांनी सदरचे कार्यक्रम गावात घेण्यात सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे अशा गावांची निवड करुन याबाबतचा सविस्तर कार्यक्रम यथावकाश आपणास कळविण्यात येईल.

७) ग्राम उदय से भारत उदय अभियानांतर्गत दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत राष्ट्रीय पंचायत राज दिवस ग्रामसभा आयोजित करावयाच्या आहेत. या ग्रामसभेमध्ये अनु.जाती, अनु.जमाती, दुर्लक्षित घटकांच्या समस्यांबाबत विशेष भर देवून चर्चा करण्यात येणार आहे. शासनाच्या विविध योजनांतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ देण्यासाठी लाभार्थी निवड करण्याचे अधिकार ग्रामसभेला आहेत. लाभार्थी निवडण्यासंदर्भातील पूर्वतयारी ग्रामपंचायत स्तरावर करण्यात येत नसल्याने ऐनवेळी योजनांचे लाभार्थी मिळत नाहीत, उद्दिष्टपूर्ती होत नाही, योग्य लाभार्थ्यांची निवड होत नाही अशा अनेक बाबी समोर येत आहेत. यासाठी दिनंक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत घ्यावयाच्या ग्रामसभेपूर्वी ग्रामपंचायतींनी विविध योजनांतर्गत लाभासाठी वैयक्तिक लाभार्थ्यांची यादी संकलित करावी व संकलित केलेल्या यादीचे वाचन सदर ग्रामसभेमध्ये करण्यात करावे. योजनांची यादी आणि संकलनाचे Format आपणास स्वतंत्ररित्या पाठविण्यात येईल.

८) ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील पत्रा क्र.संकिर्ण/2016/प्र.क्र.18/पंरा-2 दिनांक 29/2/2016 अन्वये कळविलेनुसार शौचालयाचा वापर करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यासाठी ग्रामसभेची बैठक आयोजित करणेबाबत सूचना प्राप्त आहेत. सदर शासन सूचनांनुसार, दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत आयोजित करावयाच्या

ग्रामसभांमध्ये शासन पत्रानुसार शौचालय वापराबाबत प्रमाणपत्र देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी सदरचा विषय ग्रामसभेच्या विषयपत्रिकेत घेण्यात यावा.

उपरोक्त सूचनांनुसार तसेच केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ग्राम उदय से भारत उदय अभियान तीनही टप्प्यामध्ये म्हणजेच **पहिला टप्पा**- सामाजिक एकता (Social Harmony) : दिनांक १४ ते १६ एप्रिल, २०१६., **दुसरा टप्पा**- ग्राम किसान सभा (Gram Kisan Sabha) : दिनांक १७ त २० एप्रिल, २०१६ व **तिसरा टप्पा**:- ग्रामसभा (Gram Sabha or Village Assembly) : दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ अत्यंत प्रभावीपणे, परिणामकारकरित्या राबविण्यात यावे तसेच दिनांक २४ एप्रिल २०१६ रोजी मा.पंतप्रधान महोदयांचे ग्रामसभांना उद्देशून भाषण ग्रामस्थांनी ऐकण्याची सुयोग्य व्यवस्था करणेत यावी.

आपणाकडून केलेल्या नियोजनाबाबत वेळोवेळी या कार्यालयास अवगत करावे तसेच आयोजित केलेल्या कार्यक्रमांचे ग्रामपंचायतनिहाय फोटोग्राप्स, व्हीडीओ चित्रीकरण सी.डी., अहवाल वेळोवेळी या कार्यालयास सादर करावेत. अधिक माहितीसाठी केंद्र शासनाचे www.panchayat.gov.in वेबसाईटवर Gram Uday se Bharat Uday Abhiyan या Tab वर क्लीक करुन मार्गदर्शक सूचना व अन्य माहिती आपणास उपलब्ध होऊ शकेल.

वरील सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद सातारा**

प्रत :- मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन, २५ मर्झबान पथ, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई -०१ यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, विधान भवन, पुणे-०१ यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- मा.जिल्हाधिकारी, सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- माहितीसाठी सस्नेह अग्रेषित

१) मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद, सातारा
२) मा.उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, सातारा
३) मा.सभापती, अर्थ, शिक्षण व क्रिडा समिती, जिल्हा परिषद सातारा
४) मा.सभापती, कृषि, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती, जिल्हा परिषद सातारा
५) मा.सभापती, समाजकल्याण समिती, जिल्हा परिषद, सातारा
६) मा.सभापती, महिला व बाल विकास समिती, जिल्हा परिषद सातारा.
७) मा.सभापती, पंचायत समिती... (सर्व), जिल्हा सातारा